!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे आय. ए. एस. ॲकॅडमी प्रवेशपूर्व परिक्षा १९ जुलै रोजी

**संभाजीनगर :** ( ता.१२ ) केंद्रिय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग इतर स्पर्धा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १९ जुलै रोजी सकाळी ११ ते १ दरम्यान संभाजीनगरात प्रवेश पूर्व परिक्षा आयोजित केली आहे. शिवसेना व शिव विद्या प्रबोधिनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संभाजीनगरच्या विद्यार्थ्यींसाठी १९ जुन ते १२ जुलै दरम्यान ऑनलाईन नोंदणी केली. परंतु उर्वरित विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष प्रवेश अर्ज शिवाई ट्रस्ट शिवसेना भवन संभाजीपेठ येथे उपलब्ध आहे. या प्रवेश परिक्षतेसाठी लागणारे १२५ रुपये शुल्क ही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे भरणार आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत प्रशिक्षणासोबत वेळोवेळी सहकार्य शिवसेना संभाजीनगर करणार आहे. प्रवेशपूर्व परिक्षा तयारीच्या निमित्ताने झालेल्या बैठकित शिवसेना शहरप्रमुख गटनेते राजु वैद्य, विद्यार्थी प्रमुख तुकाराम सराफ, शिवाजी बनकर, किरण तुपे आदिंनी मनोगत व्यक्त केले.

१९ जुलै रोजी प्रवेश परिक्षा, २७ जुलै रोजी निकाल, तर २ ऑगस्ट २०१५ पासुन प्रत्यक्ष प्रशिक्षणाला सुरुवात होणार आहे. या परिक्षेस मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन बैठकित गटनेता राजु वैद्य यांनी केली तसेच विद्यार्थ्यींचे परिक्षा शुल्काचा खर्च खासदार चंद्रकांत खैरे यांनी उचलला. त्याबद्दल राजु वैद्य यांनी आभार मानले. विद्यार्थी सिनेट निवडणुकीबरोबर बाळासाहेब ठाकरे आय. ए. एस. ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी शिवसेना कायम पाठिशी राहील. अशी ग्वाही तुकाराम सराफ यांनी दिली. शिवाजी बनकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवसेना हा एकमेव पक्ष असा आहे की, २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करणारा आहे.

या बैठकिस संदीप खंबाट, कुणाल त्रिभुवन, किरण दळे, किरण रेड्डी, नामदेव कचरे, दत्ता शेलार, अक्षय दाभाडे, अक्षय दाभाडे, किरण गायकवाड, शैलेश कानकाटे, पंकत बोर्डे, ज्ञानेश्वर तुपे, डॉ. किशोर सुर्यवंशी, कुकलारे पवन, पुनमचंद सलामपुरे, सुरेश वाघमारे, नागेश थोरात, शरद चोपडे, अजय चोपडे, अखिलेश त्रिवेदी, महेंद्र कांबळे, प्रसाद देशपांडे, डॉ. मोहन जोशी, गोविंद तांगडे, गणेश वाघ, शिवानंद मोघे आदिंची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ / मनोज वडगावकर**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400